गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



# भारती विद्यापीठाचे

## डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद-भारती

A Tri - Monthly News Letter

Oct-Dec :2017



संपादक मंडळ

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

सदस्य:

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम्.एच्.पाटील

संवाद भारती विशेष

# विचार बदला



एक खूप श्रीमंत माणूस होता. पण त्याच्याकडे असलेल्या संपत्ती एवढे त्याचे मन मोठे नव्हते. एखाद्याला पैसे दिले तर स्वत:चे मोठेपण तो १० लोकांना जाऊन सांगयचा. तो जेथे-जेथे जायचा तेथे आपण किती दानशूर आणि दयाळू आहोत याबद्दल सांगायचा. एके दिवशी शहरात थोर विचारवंत आले असल्याचे त्याला कळले. तो त्वरित त्यांना भेटायला गेला. त्या श्रीमंतमाणसाचे आदरातिथ्य केल्यावर त्या थोर विचावंताने त्याला भेटायला येण्याचे कारण विचारले. मात्र आपले येण्याचे कारण न सांगता तो स्वत:च्या संपतीचे आणि दानशूरतेचे गोडवे गाऊ लागला. त्याच्या दानशूरपणाच्या गोष्टी सांगून झाल्यावर त्या श्रीमंत माणसाने पैशाचे पाकिट काढून थोर विचारवंताला देऊ केले आणि म्हणाला, 'तुम्हाला पैशाची गरज आहे असे मला वाटले म्हणून मी हे आणले आहे.' हे सांगत असताना त्याच्या डोळ्यात वेगळात अहंकार दिसत होता. त्या थोर विचारवंत पैशाचे पाकिट बाजूला करत म्हणाले, 'मला या पैशांची नव्हे तर तुझी गरज आहे.' हे ऐकून तो श्रीमंत माणूस दुखावला गेला. मी दिलेले पैसे यांनी नाकरण्याचा हिंमत कशी केली. आतापर्यंत मी दिलेले पैसे कोणीही नाकरण्याचे धाडस केले नाही, असे तो मनातल्या मनात म्हणाला.

तेवढ्यात थोरविचावंत म्हणाले, 'तुला माझ्या वागण्याचे वाईट वाटले असेल ना!' तो श्रीमंत माणूस म्हणाला, 'वाईट तर वाटणारचं. मी देऊ केलेली मदत तुम्ही नाकारलीत जणू काही मी हे पैसे नाही तर माती आहे.' हे ऐकून ते विचारवंत म्हणाले, 'हे पाहा महाशय, दात्याने केवळ पैसे देले आणि स्वत:ला अर्पण कले नाही तर त्याचे मोल माती प्रमाणेच असते. दान या शब्दाचा खरा अर्थ आहे की, कोणत्याही असलेल्या गोष्टीचे समान भाग करुन अर्धी गोष्ट दुसऱ्याला देणे. है पैसे जे तू मला दिलेस ते काही सगळेच तुझे नाहीत. हे पैसे तू दान करतोस यात अभिमान काय बाळगायचा? हे तर तू केलेल्या चोरीचे प्रायश्चित केल्या सारखे आहे.'

हे ऐकून त्या धनिकाचा अहंकार तुटला आणि त्याचे विचार बदलले.

पुढारी | सोमवार ४ डिसेंबर २०१७

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात मतदार जागृती कार्यक्रम

सांगली : प्रतिनिधी

भारती विद्यापीठातर्फे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मतदार जागृती कार्यक्रम झाला. यावेळी पथनाट्याद्वारे मनोरंजनातून विद्यार्थ्यांना लोकशाहीसाठी मतदानाचे महत्व पटवून दिले. मतदार नोंदणीसाठी लागणारा फॉर्म नंबर ६ व पत्ता यातील बदल किंवा इतर माहितीतील बदल, सोबत जोडावी लागणारी कागदपत्रे या विषयी त्यांनी पथनाट्यातून प्रबोधन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी.जी.कणसे होते. प्रा.सौ.भारती भावीकट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. नितीन गायकवाड यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. प्रभा पाटील, प्रा.वासंती गावडे, प्रा. तानाजी सावंत यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

तरुण भारत | मंगळवार, ५ डिसेंबर २०१७

## एडस् दिनानिमित्त रॅली

सांगली : भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, शैक्षणिक संकुल यांच्यावतीने जागतिक एडस् दिनानिमित्त रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ विद्यापीठाचे मानद संचालक डॉ. एच.एम. कदम यांच्याहस्ते झाले. राजवाडा चौकातून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. यामध्ये डॉ. निलिमा भोरे, डॉ. विद्या दोडवाड, डॉ.ए.बी. पाटील, डॉ. डी.जी.कणसे, डॉ. दिलीप मगदूम, डॉ. समृध्दी मेहता, यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ नर्सिंग, दंत महाविद्यालय, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, यामधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

तरुण भारत | गुरुवार, ७ डिसेंबर २०१७



सांगली : प्राचार्य डॉ. कणसे यांचा सत्कार करताना वसंत पाटील, समवेत विद्या पाटील, श्रीकृष्ण मोहिते आदी.

## प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचा सत्कार

सांगली : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर निवड झाल्याबद्दल भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांचा सांगलीवाडीवासियांच्यावतीने माजी नगरसेवक वसंत पाटील व माजी नगरसेविका सौ.विद्या पाटील यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. श्रीकृष्ण मोहिते, आर.डी.कदम, डॉ.बी.डी.पाटील, प्रा.नितीन गायकवाड, प्रा. सौ.प्रभा पाटील, हरिभाऊ टिंगरे, प्रा.संजय ठिगळे, प्रा.पद्माकर जगदाळे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कणसे यांची नुकतीच अधिसभेवर बिनविरोध निवड झाली आहे.

दैनिक **ललकार**

दि.१०/१०/२०१७ पान नं.१२



## सौ. विजयमाला कदम यांचे हस्ते कलाभारतीचे अनावरण

सांगली दि. ९ - डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली येथे 'कलाभारती' या भितीपत्रिकेचे अनावरण भारती विद्यापीठाच्या शालेय शिक्षण विभागाच्या अध्यक्षा, सौ. विजयमाला पतंगराव कदम यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आपल्या अंगी असणाऱ्या विविध गुणांची जोपासना करावी. व्यक्तीमत्व विकासासाठी या सर्वांची आजच्या युगात आवश्यकता आहे. भारती विद्यापीठ महाविद्यालयाच्या माध्यमातून तरुणाईला संधी देण्याचे काम करीत आहे.

विद्यार्थ्यांनी त्याचा आपल्या विकासासाठी उपयोग करावा, असे विचार सौ. विजयमाला कदम तथा वहिनीसाहेब यांनी मांडले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांच्या साहित्य कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयामध्ये वर्षभर हा उपक्रम राबविला जातो हे सांगून विद्यार्थ्यांच्या उन्नती व उत्कर्षात अशा सर्व उपक्रमांचे महत्व अधोरेखित केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयामधील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

**तरुण भारत**

गुरूवार, ९ नोव्हेंबर २०१७

## विद्यापीठ अधिसभा सदस्यपदी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे

**सांगली :** भारती विद्यापीठाच्या येथील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.जी. कणसे यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यान्वये शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य प्रवर्गातून प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

या निवडीबद्दल भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ.पतंगराव कदम यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भारती विद्यापीठाचे प्र.कुलपती डॉ.शिवाजीराव कदम, कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे, माजी कुलगुरू डॉ.उत्तमराव भोईटे, डॉ.एस.एफ. पाटील, सहकार्यवाह प्राचार्य डॉ.के.डी.जाधव, विभागीय संचालक डॉ.एच.एम. कदम आदी उपस्थित होते.

डॉ.कणसे यांनी भारती विद्यापीठाच्या विविध शाखामध्ये काम केले आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी अनेक शोध निबंध सादर केले आहेत. स्कॉटलंड व मलेशिया या देशांचा त्यांनी शैक्षणिक दौरा केला आहे.पीएचडीच्या अनेक विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

**तरुण भारत**

मंगळवार, २८ नोव्हेंबर २०१७

थोडक्यात महत्वाचे



सांगली : विजयी स्पर्धकांसमवेत प्राचार्य डी. जी. कणसे, उपप्राचार्य एम. एच. पाटील, प्रा. वैजनाथ महाजन, प्रा. पद्माकर जगदाळे, प्रा. रुपाली कांबळे आदी.

## डॉ. कदम महाविद्यालयाचे यश

**सांगली :** नेहरु युवा केंद्र आणि एशियन शितोरिओ असोसिएशन बेळगाव यांच्यातर्फे आयोजित क्रीडा स्पर्धा २६ रोजी आपटा पोलिस चौकीमागील क्रीडांगणावर पार पडल्या. या स्पर्धेत सांगलीवाडीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे खेळाडूंनी राष्ट्रीय कराटे व बॉक्सिंग स्पर्धेत उज्ज्वल यश संपादन केले. यामध्ये बॉक्सिंग स्पर्धेत प्राजक्ता कदम बी एससी भाग-३ हिने ५७ ते ६० किलो गटात द्वितीय, भाग्यश्री कराडे बीकॉम भाग-३ हिने ४९ ते ५२ गटात तृतीय, वैशाली जाधव बीकॉम भाग-२ हिने ५४ ते ५६ गटात तृतीय, तर पूजा कोष्टी बीकॉम भाग-२ हिने ४५ ते ४८ गटात तृतीय क्रमांक पटकावला. तर कराटे स्पर्धेत प्राजक्ता कदम बी एससी भाग-३ हिने ५२ ते ६० किलो गटात प्रथम, भाग्यश्री कराडे बीकॉम भाग-३ हिने ४५ ते ५० गटात तृतीय, वैशाली जाधव बीकॉम भाग-२ हिने ५४ ते ५६ गटात तृतीय, पुनम कोष्टी बी कॉम भाग-२ हिने ४० ते ४५ किलो गटात तृतीय, पूजा कोष्टी बीकॉम भाग-३ हिने ४० ते ४५ गटात तृतीय व श्रेयस गायकवाड अकरावी सायन्स याने ७० ते ७५ गटात तृतीय क्रमांक पटकावला.

**तरुण भारत**

गुरुवार, ३० नोव्हेंबर २०१७

## कदम महाविद्यालयात अंताक्षरी स्पर्धा

**सांगली :** रेडिओ सिटी यांच्यावतीने भारती विद्यापीठाच्या डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात सिटीची अंताक्षरी ही स्पर्धा घेण्यात आली. प्राचार्य डॉ.डी.जी.कणसे यांच्याहस्ते रेडिओ सिटीच्या जॉकी चैत्राली व अर्जून यांचा सत्कार करण्यात आला. सिटीची अंताक्षरी ही पाच गटात स्पर्धा घेण्यात आली. त्यांना रेडिओ सिटीतर्फे बक्षिसे देण्यात आली. आर.जे. चैत्राली यांनी रेडिओ जॉकीविषयी माहिती दिली. प्रा.प्रभा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा.डॉ.बी. डी. पाटील, प्रा.एम. एच. पाटील, प्रा.श्रीकृष्ण मोहिते, डॉ.आनंदा सपकाळ, प्रा.वासंती गावडे, प्रा. अरूण जाधव आदी उपस्थित होते.

**तरुण भारत**

सोमवार, ११ डिसेंबर २०१७

## डॉ. कदम महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा

**सांगली :** भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय आणि आय. पी. एफ. ए. सी. ई. व्हेंचर सेंटर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यप्रसंगी आशुतोष प्रचंड व अर्चना जोशी यांचे बौद्धिक संपदा हक्क व पेटंट या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. पहिल्या सत्रात मार्गदर्शन करताना आशुतोष प्रचंड म्हणाले, आपल्याला संशोधनाच्या माध्यमातून बऱ्याच गोष्टी साध्य करतान येतात. मात्र त्या संशोधनाला पेटंट प्राप्त होणे, याचासारखा आनंद नाही. संशोधनाच्या माध्यमातून प्राप्त झालेले पेटंट देशविकासाला चालना देणारे असते. तर अर्चना जोशी म्हणाल्या, पेटंटसाठी अर्ज करणे आणि पेटंट मिळवणे हे खरे कौशल्य आहे. आपण संशोधन करतो, पण पेटंट घेण्याच्या बाबतीत कमी पडतो. स्वागत प्रा. डॉ. अमित सुपले यांनी केले. प्रा. डॉ. अंकुश सरगर यांनी आभार मानले. यप्रसंगी कार्यशाळा अध्यक्ष प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, यांच्यासह विविध विषयातील प्राध्यापक उपस्थित होते.

आजच्या अंकासोबत प्रवाह

पुण्य नगरी

रविवार

www.epunyanagari.com | Call Center : 18001206252

मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, आणि · रविवार, १२ नोव्हेंबर २०१७ · कोल्हापूर - सांगली, अमरावती, अकोला येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे प्रचंड खपाचे दैनिक

# डॉ. कदम महाविद्यालय, विद्यापीठात सामंजस्य करार

**सांगली / प्रतिनिधी :**

भारती विद्यापीठाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा भाग म्हणूनच शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असो. कोल्हापूर व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाची अनेक अधिवेशने, चर्चासत्रे व कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ जे. एफ. पाटील, भारती विद्यापीठाचे विभागीय मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डी. जी. कणसे, सुवेकचे अध्यक्ष प्रा. सुभाष दगडे, कार्यवाह प्रा. संजय ठिगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.



**सांगली : शिवाजी युनिव्हर्सिटी व डॉ. कदम महाविद्यालय यांच्यातील करारप्रसंगी जे. एफ. पाटील, एच. एम. कदम, डी. जी. कणसे.**

यावेळी डॉ. जे. एफ. पाटील म्हणाले, महाविद्यालयीन युवकांत अर्थसाक्षरता निर्माण होण्याची नितांत गरज आहे. अर्थसाक्षरतेच्या अभावामुळेच अनेक प्रकारचे घोटाळे निर्माण होतात. ते टाळण्यासाठी स्वयंसेवी संस्था व महाविद्यालयांनी एकत्रित येऊन नवनवीन उपक्रम राबविले पाहिजेत.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाल्याबद्दल जे. एफ. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अध्यक्षपदावरून डॉ. एच. एम. कदम म्हणाले, सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्रित येऊन काम केल्यास शैक्षणिक विकास होण्यास मदत होईल. महाविद्यालयीन उपक्रमांविषयी प्राचार्य डॉ. कणसे म्हणाले, विद्यालयात नवनवीन उपक्रम राबविले जातात. मात्र स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अशा उपक्रमांना अधिक गती प्राप्त होते.

स्वागत प्रा. संजय ठिगळे यांनी केले. आभार तानाजी सावंत यांनी मानले. यावेळी डॉ. भीमराव पाटील, प्रा. एम. एच. पाटील उपस्थित होते.

पुण्य नगरी

सोमवार, १३ नोव्हेंबर २०१७



सांगली : प्राचार्य डी. जी. कणसे यांचा सत्कार करताना पतंगराव कदम. सोबत प्र. कुलपती शिवाजीराव कदम, कुलगुरु माणिकराव साळुंखे.

# डी. जी. कणसे यांचा निवडीबद्दल सत्कार

सांगली / प्रतिनिधी

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. कणसे यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्यांच्या प्रवर्गातून प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवड झाल्यामुळे कुलपती पतंगराव कदम यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्र. कुलपती शिवाजीराव कदम, कुलगुरु माणिकराव साळुंखे, माजी कुलगुरु, उत्तमराव भोईटे, एस. एफ. पाटील, सहकार्यवाह प्राचार्य के. डी. जाधव, विभागीय संचालक एच. एम. कदम तसेच अन्य पदाधिकारी व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर-सेवक उपस्थित होते.

सोमवार १३ नोव्हेंबर २०१७

केसरी



सामंजस्य करारा दरम्यान उपस्थित ज्येष्ठ साहित्यीक प्रा. वैजनाथ महाजन, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ बी. डी. पाटील, कार्यवाह प्रा. संजय ठिगळे, प्रा. डॉ. जे. व्ही. कुन्हेकर.

# महाराष्ट्र साहित्य परिषद व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार

**सांगली : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय गेली अनेक वर्षे नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबवित आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमाचा भाग म्हणूनच महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, सांगली व डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असून या करारांतर्गत महाविद्यालयात साहित्य संमेलन, कविसंमेलन, साहित्य निर्मिती लेखन कार्यशाळा, माजी विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन; त्याचबरोबर विविध विषयांवरील पुस्तकाचे प्रकाशन असे अनेक उपक्रम राबविले जाणार आहेत.

सामंजस्य कराराप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक प्रा. वैजनाथ महाजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सांगली शाखेचे उपाध्यक्ष डॉ बी. डी. पाटील, कार्यवाह प्रा. संजय ठिगळे प्रा. डॉ. जे. व्ही. कुन्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. वैजनाथ महाजन म्हणाले, की, महाविद्यालयीन जीवनातच विद्यार्थ्यांच्यात साहित्याविषयी आवड निर्माण झाली पाहिजे. केवळ परीक्षेतील मिळणाऱ्या गुणांमुळे विद्यार्थ्यांचा विकास होत नाही. त्याबरोबरच साहित्य, कला व क्रीडा क्षेत्रातसुद्धा चांगले यश संपादन करता आले पाहिजे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने साहित्य चळवळ अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न केला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे म्हणाले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यात वाचन संस्कृती विकसित होण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी साहित्य परिषद व महाविद्यालयाच्या वतीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. विशेषतः भारतीयम्च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्यात कलासंस्कृती विकसित केली जाते. म हाविद्यालयीन युवकांच्यात कला गुण विकसित करणे काळाची गरज आहे. उपस्थितांचे स्वागत प्रा. डॉ. बी. डी. पाटील यांनी केले. आभार प्रा. संजय ठिगळे यांनी मानले. याप्रसंगी प्रा. एम. एच. पाटील, मान्यवर उपस्थित होते.

दक्षिण महाराष्ट्र

केसरी

१३ नोव्हेंबर २०१७

# डॉ. कदम महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**सांगली : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयाच्यावतीने वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या कार्याच्या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. बी. डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. जे. डी. हाटकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. पाटील यांनी केले.

दैनिक ललकार

दि.१६/१०/२०१७ पान नं.१२

# शिक्षण मानवी भांडवल निर्माण करते

## प्रा. डॉ.जे.एफ. पाटील




सांगली दि. १४ – शिक्षण आणि आरोग्य हे देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे सरकारने शिक्षण व आरोग्य या दोन महत्वाच्या विषयावर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.अलिकडे शिक्षण व आरोग्य सेवेत आलेली व्यावसायिकता देशाच्या सर्वांगिण विकासाला घातक आहे असे मत जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे होते.प्रमुख उपस्थितीत दै. जनप्रवासचे संपादक हणमंत मोहिते होते. प्रारंभी उपस्थितांचे स्वागत माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक प्रा. संजय ठिगळे यांनी केले.

मार्गदर्शनपर भाषणात डॉ. जे.एफ. पाटील म्हणाले की, या देशातील प्रत्येकाला शिक्षण मिळालेच पाहिजे. शिक्षण मिळणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. शिक्षण घेण्याची ऐपत नसणाऱ्यांना शिक्षण मोफत मिळाले पाहिजे ती जबाबदारी सरकारची आहे.


दै. जनप्रवासचे संपादक हणमंत मोहिते म्हणाले की, पत्रकारितेच्या क्षेत्रात मला जे यश मिळाले त्यामध्ये महाविद्यालयाचे मोठे योगदान आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे म्हणाले की, गेल्या तीन दशकात महाविद्यालयात जी प्रगती केली आहे. त्यामध्ये माजी विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आहे. इथून पुढच्या काळात विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे याप्रसंगी विश्वजीत पाटील अश्विनी, वडगांवे परशू अथनी, आरीफ मुल्ला, श्वेता मकानदार, इ. विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे आभार प्रा. पुष्पांजली चव्हाण यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रभा पाटील यांनी केले. याप्रसंगी माजी विद्यार्थी त्याचबरोबर प्रा. बी. डी. पाटील, प्रा. एम.एच.पाटील व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

ललकार
२१/११/२०१७ ६

# कुशलप्रशासक-डॉ. एच.एम. कदम

घरातून बालपणापासून होणारे संस्कार हेच प्रत्येकाला यशस्वी जीवनाचा मार्ग दाखवीत असतात. कष्ट, मेहनत, जिद्ध आणि सचोटी या चतुःसूत्रीचा आधार घेऊन अंगभर सोन्यापेक्षा डोक्यात सोन्यासारखे मौलिक विचार घेऊन आपल्या कार्यकर्तुत्वाला चिरकाल टिकणारे सौंदर्य प्राप्त करून देणारी काही आगळी-वेगळी व्यक्तिमत्व समाजामध्ये असतात अशी व्यक्तिमत्व फणसा सारकीं वरून जरी काटेरीदिसत असली तरी आतून रसाळ आणि मधाळ स्वभावाची असतात. अशा व्यक्तिमहत्वापैकी भारती परिवारातील सर्वांचं लाडकँ व्यक्तिमहत्व म्हणजे डॉ. एच.एम. कदम उर्फ आण्णा ज्यांनी वैद्यकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा दिली आहे. त्यांच्या आदर्शवत कर्तव्यदक्ष अशा नियोजनापढे सर्वांना अगदी मनापासून समर्पित व्हावे असे वाटते. सध्या आदरणीय डॉ. एच. एम. कदम (सर) हेभारती विद्यापीठाच्या विभागीय मानद संचालकपदी सेवारत आहेत. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त या शब्दसुमनांच्या शुभेच्छा. जनता व सेवकयांच्यामध्ये उत्तम संवाद, लोककल्याणासाठी विविध धोरणे आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी प्रतिमा निर्माण केलेली आज आपणास पाहावयास मिळते. बोलण्या पेक्षा कर्तुत्वाला महत्व देऊन जास्तीतजास्त वेळ आपल्या कार्यालयात उपस्थित राहून प्रशासनातील अडचणी सोडवून सर्वसामान्य जनतेशी सुसंवाद साधत भारती विद्यापीठाचे संस्थापक,डॉ. पतंगराव कदमसाहेब, प्र-कुलपती, डॉ. शिवाजीराव कदम सर व सोनहिरा कारखान्याचे अध्यक्ष श्री. मोहनराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. एच.एम. कदम यांनी लोकहिताचे स्तुत्य पाऊल उचलेले आहे.

वडील मोहनराव कदम, आई यशोदा कदम व काका आदरणीय डॉ. पतंगराव कदमसाहेब, प्र-कुलपती, डॉ. शिवाजीराव कदम सर यांचे लहानपणापासून लाभलेले आदर्श संस्कार, शिस्तीचे बाळकडू, तसेच उच्च शिक्षणाबरोबर लाभलेली सामाजिक व मानवतावादी संवेदनांची जाणीव हि शिदोरी घेऊन डॉ. एच.एम. कदम यांनी आपली कर्तृत्वाची शिखरे पादाक्रांत केलेली आहेत. आपल ेप्राथमिक शिक्षण सोनसळ या गावी तर पुणे येथे शंकरराव मोर ेविद्यालयात हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी पुणे विद्यापीठाची बी.फार्म. व एम. फार्म. पदवी पूर्ण केली. शिक्षण क्षेत्रातील विद्यावाचस्पती



फार्मसीमध्येला डॉ. कदम यांनी प्राध्यापक म्हणून शैक्षणिक कार्याची सुरुवात केली. पासून इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीमध्ये प्राचार्यपदाची धुरा सांभाळत वैद्यकीय क्षेत्रातील प्रशासनात आपली अमिट छाप निर्माण केली आहे.

भारतीविद्यापीठाचेसंस्थापकडॉ. पतंगरावकदमसाहेब, प्र-कुलपती,डॉ. शिवाजीराव कदम सर वसोनहिरा कारखान्याचे

कवच डॉ. एच.एम. कदम सरांना प्राप्त झाले असल्यामुळे सन सालापासून सांगलीतील भारतीविद्यापीठ विभागाचे मानद संचालक म्हणून गेले वर्षे कार्यरत आहेत. भारती वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलच्या माध्यमातून गोरगरिबांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचा त्यांनी अतिशय मनापासून व प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. दूरदृष्टी व नाविन्यपर्ण विधायक उपक्रमांच्या

अनमोल मार्गदर्शनाखाली सुरु झाले आहे. सुसंस्कृत विचारांचा वारसाव सर्वांगीण विकासाची दृष्टी डॉ. एच.एम.कदम यांना लाभलेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानांतील कमालीची रुची, आधुनिक कल्पकदृष्टी व उच्च विद्याविभूषित म्हणून डॉ. कदम यांची वेगळी प्रतिमा सर्वसामान्यांपासून ते उच्च सुशिक्षितांच्या मनात निर्माण झालेली आहे. सतत प्रसन्न, हसरं व्यक्तिमत्व, स्वच्छ पोशाख, विषयाचा सखोल अभ्यास, उत्कृष्ठ नियोजन, सातत्याने काम करण्याची वृत्ती व कमालीची शिस्त या सर्वांगीण गुणांच्या मिलनाने डॉ. एच.एम.कदम यांनी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून वैद्यकीय क्षेत्रात सेवा केली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील अखिल भारतीय फार्मसी शिक्षक संघटना, इंडियन सोसायटी फॉरटेकनिकलएज्युकेशन, इंडियन फार्मास्युटिकल असोशिएशन वइंडियन सोसायटी फॉरक्लिनिकल फार्माकॉलॉजिक आदी संस्थांवर ती डॉ. एच.एम.कदम कार्यरत असून त्यांनी संशोधन क्षेत्रामध्ये हुन अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध केलेआहेत. त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुणे महानगरपालिकेने आदर्श

उपक्रमशीलता हा त्यांचा स्थायी भाव असल्यामुळे सांगली, कडेगांव, कराड व कोल्हापूर येथील भारती विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन समितीचे अश्रेणी मिळवण्यासाठी डॉ. एच.एम.कदम यांनी उत्तम प्रशासकीय भूमिका बजावली आहे. सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्यातील भारती विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या विविध शाखा डॉ. एच.एम.कदम यांच्या अनमोल मार्गदर्शनाखली कार्यरत आहेत. आपण आजपर्यंत ज्या-ज्या शाखेत सेवा दिलीत आणि आजही देत आहात तिथं विद्यार्थी, शिक्षक, सेवक व भारती हॉस्पिटलमधील रुग्णयांची काळजी घेता आणि हेकार्यकरत असताना संस्थेबद्दलचा आदर आपल्या मनामध्य ेकृतीद्वार ेवेळोवेळी प्रकट होत असताना आम्हा सर्वांना दिसतो. आपल्या प्रगतीची मशाल अशीच तेवत राहो. अथक परिश्रमानेव संयमाने इथून पुढचा भविष्याचा वेग आपण काबीज करावा व आपल्या हातून वैद्यकीय क्षेत्रामध्ये दीपस्तंभासारखें अनमोल कार्य घडावे याकरिता आपणास मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा.